# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००


जा.क्र.मका/कार्यक्रम/२०१६-१७/५४८ दिनांक: २६/०७/१६

## परिपत्रक

विषय:मंडळाच्या योजना,उपक्रम व कार्यक्रमांचा कामगार व कामगार कुटुंबियांना लाभ देताना अर्जासोबत कामगार कल्याण निधी कपात केल्याची माहे जुन/डिसेंबरची वेतन पावती घेणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचीत करण्यात येते की, मंडळाच्या योजना,उपक्रम व कार्यक्रमांचा लाभ कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मंडळाच्या राज्यातील कामगार कल्याण केंद्रामार्फत दिला जातो.लाभ देताना केंद्राचा सर्वसाधारण सभासद नोंदणी फॉर्म भरुन घेतला जातो तसेच योजनांचा लाभ असेल तर सभासद नोंदणी फॉर्म सोबत त्या योजनांचा फॉर्म भरुन घेतला जातो.

सभासद कामगार किंवा कामगार कुटुंबिय आहे किंवा कसे या करीता कामगार असेल तर तो ज्या आस्थापनेत काम करीत आहे त्या आस्थापनेतील कामगार कल्याण निधी कपात दर्शविलेली माहे जून/डिसेंबरची वेतन पावती किंवा आस्थापनेचा दाखला घेण्यात येत असतो.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधी कामगारांच्या वेतनातून कपात करुन आस्थापनेच्या वर्गणीसह भरण्याची जबाबदारी ही संबंधीत आस्थापनेच्या मालकाची आहे. आस्थापनेने निधी न भरल्यास मंडळाच्या योजना व उपक्रमाचा लाभ सदर कामगारास व त्याच्या कुटुंबियांस दिला जात नाही.अनेकदा आस्थापनांचे मालक कामगारांची व आस्थापनांची वर्गणी स्वताच भरतात त्यामुळे कामगारांच्या वेतन पावती मध्ये कपात दाखवली जात नाही.तसेच कामगारांना दाखला मिळण्या बाबत बऱ्याच अडचणी येत असतात.त्यामुळे मंडळाच्या योजना,उपक्रम व कार्यक्रम राबवित असताना कामगार व कामगार कुटुंबियांच्या सहभागाबाबत अडचणी निर्माण होतात.

वरील विषयास अनुसरुन यापुढे असे निर्देश देण्यात येत आहे की,मंडळाच्या आर्थीक लाभाच्या योजना वगळून मंडळाचे उपक्रम व कार्यक्रमांचा लाभ कामगार व कामगार कुटुंबियांना देतांना त्यांच्याकडे कामगार कल्याण निधी कपात केल्याची वेतन पावती नसल्यास किंवा दाखला नसल्यास त्या केंद्राच्या केंद्र प्रमुखाने संबंधित कामगाराच्या आस्थापनेस भेट देऊन तो व्यक्ती कर्मचारी या व्याख्येत ("कर्मचारी" म्हणजे, प्रत्यक्षपणे मालकाकडून किंवा कंत्रटदारामार्फत किंवा इतर कोणत्याही एजन्सीमार्फत एखाद्या व्यापारी संस्थेत कोणतेही कसबी किंवा बिनकसबी, अंगमेहनतीचे,कारकुनी,पर्यवेक्षकीय किंवा

तांत्रीक काम करण्यासाठी मजुरीने किंवा बक्षीस देऊन कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती, परंतु तीत, —

(एक) जिला मुख्यत: व्यवस्थापकीय कामासाठी नोकरीत घेतले आहे.

(दोन) जिला पर्यवेक्षकीय कामासाठी नोकरीत घेतले असुन तिला दरमहा तीन हजार पाचशे रुपयांहून अधिक वेतन मिळत आहे किंवा एकतर, पदास संलग्न असलेल्या कर्तव्याच्या स्वरुपास अनुसरुन किंवा तिच्याकडे निहित करण्यात आलेल्या अधिकारांमुळे जी मुख्यत्वेकरुन व्यवस्थापकीय स्वरुपाच्या अधिकारांचा वापर करीत आहे किंवा तशी कर्तव्ये पार पाडीत आहे. किंवा

(तीन) शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये जिला शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीत घेण्यात आले आहे, अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होणार नाही.) बसत असल्याची खात्री करावी व तसा दाखला देऊन केंद्राच्या दप्तरी ठेवावा. तसेच कमगार कल्याण निधी भरत नसल्यास त्याबाबतची माहिती गट व विभागीय कार्यालयामार्फत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी व संबंधीत व्यक्तिंना व त्यांच्या कुटुंबियांना **मंडळाच्या आर्थीक लाभाच्या योजना वगळून** उपक्रम व कार्यक्रमाचा लाभ देण्यात यावा.

कल्याण आयुक्त

प्रत :

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.
२) लेखा अधिकारी /लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम/भांडार/संगणक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) प्रशासन अधिकारी/विधी अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
५) प्रसिध्दि व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
६) सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/अकोला/नागपुर.
७) प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
८) कामगार विकास अधिकारी, कामगार कल्याण भवन, नागपुर/पुणे.
९) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालय.
१०) सर्व कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये) ★★★
११) सर्व केंद्र प्रमुख,

★★★ यांनी सदर परिपत्रकाची प्रत केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन देऊन त्याची प्रत घेऊन दप्तरी ठेवावी.